तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २०१७ सालच्या निवडणूकीत निवडून आलेल्या कार्यशील नगरसेविका स्वर्गीय सौ.अर्चनाताई तानाजी बारणे यांचे दि.१३/०७/२०२१ रोजी दु:खद निधन झाले त्यांचे कार्य अतिशय सोज्वळ आणि निर्मळ असे होते लोकांमध्ये त्यांची लोकप्रियता पाहता व त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून प्रभाग क्र. २३ मधील सर्व नागरिकांची मागणी व नगरसेविका स्व.अर्चना तानाजी बारणे यांची आठवण म्हणून थेरगाव येथील थेरगाव रुग्णालयाला नगरसेविका स्व.सौ.अर्चनाताई तानाजी बारणे यांचे नाव देण्यास तसेच थेरगाव येथील नव्याने विकसीत करण्यात आलेल्या सर्वे नं. ९ मधील बहुउद्देशीय इमारतीस स्वर्गवासी हिरामणशेठ चंदु बारणे यांचे नाव देण्यास

व आरक्षण क्रमांक ६२८ येथील क्रिडांगणास स्वर्गीय मोरु महादु बारणे यांचे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. ३० मधील खालील कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | पान क्र. | अ.क्र. | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ केलेली अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२२चा मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३० कासारवाडी येथे स्मशनभुमी बांधणे | ३० | विशेष योजना | ५३ | ९६ | ५०००००० | १०००००००० | २०००१००० |
| २ | कासारवाडी येथील मुस्लीम दफनभुमीमध्ये सुधारणा विषयक कामे करणे | ३० | विशेष योजना | ५६ | २०१ | ५०००००० | १०००००००० | १००००००० |
| | | | | | | १०००००००० | २०००००००० | ३०००१००० |

तरी वरील कामासाठी सन २०२०-२१ साठीचे अंदाजपत्रकीय रकमेत वरीलप्रमाणे आवश्यक वाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ८ मधील सेक्टर १० मधील विश्वेश्वर चौक ते खंडेवस्ती पर्यंतच्या पूर्ण रस्त्याला श्री संत नामदेव पथ असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे तसेच सेक्टर १३ शुभ आंगनपासून ते बाबर पोटे सोसायटी मागील रस्ता ते जाधववाडी कडे जाणा-या संपूर्ण रस्त्याला कै. सतिश रामदास वडसकर पथ असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी ते औंध गावाकडे जाणा-या (स्पायसर कॉलेज रोड) मुळा नदीवरील पुलाचे “छत्रपती संभाजी महाराज पुल” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील शास्त्री गार्डन व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणेचे काम सुरू आहे. सदर कामांतर्गत अंदाजपत्रकात समाविष्ठ असलेल्या काही ठिकाणामध्ये नागरीकांच्या मागणी प्रमाणे स्थळ बदल करणे आवश्यक आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकात समावेश असलेले कामाचे ठिकाण | अंदाजपत्रकामध्ये समावेश असलेल्या ठिकाणा ऐवजी बदल केलेले कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील शास्त्री गार्डन व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | अयप्पा मंदिर रस्ता | शितलादेवी मंदिर ते शिवाजी महाराज चौक |

तरी वर नमूद केलेप्रमाणे प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील शास्त्री गार्डन व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामामध्ये स्थळबदल करणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -६७१ विषय क्रमांक – २

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३२३/२०२१ दिनांक २/७/२०२१

२) मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२९ दि.२३/०७/२०२१

३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१००७७ दि.४/८/२०२१

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) समाधी ठिकाणी, तुळापुर येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता अनुदान, आर्थिक सहाय्य अदा करणेकामी, " ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) कार्यक्रमासाठी द्यावयाचे अनुदान" असे नव्याने लेखाशिर्ष करणेस व या लेखाशिर्षावर सन २०२१-२२ पासून दरवर्षी र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रू.तीन लाख फक्त) इतकी तरतूद करणे या करिता उपयोगिता प्रमाणपत्र/विनियोग दाखला, खर्चाच्या पावत्या सादर करणे व दरवर्षी मान्यता देणेत येत आहे.

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१००९६ दि.४/८/२०२१

कोविड-१९ अंतर्गत मनपाच्या वाय.सी.एम. हॉस्पिटलमधील विद्युत व्यवस्था / पुरवठा २४ X ७ अखंडितपणे ठेवणेकामी वाय.सी.एम.एच. (विद्यूत) विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी अतिशय कार्यक्षमपणे कोविड-१९ अंतर्गत कामकाज केलेले असल्याने खालील यादीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ (३ महिन्यांचा) प्रति माह व प्रत्येकी र.रू.१०,०००/- याप्रमाणे कोविड भत्ता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | दिलीप श्रीरंग धुमाळ | कार्यकारी अभियंता |
| २ | वासुदेव तुकाराम अवसरे | कनिष्ठ अभियंता |
| ३ | मुकुंद श्रीधर पाटील | वीज पर्यवेक्षक |
| ४ | राघवेंद्र रामचंद्र धर्मकांबळे | वीजतंत्री |
| ५ | दिलीप शिवराम गुंजाळ | वीजतंत्री |
| ६ | रोहिदास बाजीराव गोळे | तारतंत्री |
| ७ | अमोल सतिश खराडे | तारतंत्री |
| ८ | अंकुश बजरंग माळी | जनित्र चालक |
| ९ | अनिल दत्तात्रय जगताप | जनित्र चालक |
| १० | धनाजी मारूती गावडे | जनित्र चालक |
| ११ | सुनिल शांताराम सुपे | जनित्र चालक |

| | | |
|---|---|---|
| १२ | अनिल हिरामण नागापुरे | जनित्र चालक |
| १३ | अंकुश तुकाराम गुंड | मजूर |
| १४ | मधुकर राजाराम ठोंबरे | मजूर |
| १५ | गिरीष गोरखनाथ जाधव | मजूर |
| १६ | मारूती माणिक माने | मेंटनन्स हेल्पर |

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत वायसीएम हॉस्पीटल मध्ये कोविड रुग्णांसाठी काम केलेले व करणारे बॉडी स्कॉड मधील सर्व कामगार कर्मचा-यांना सुध्दा इतर कर्मचा-यांप्रमाणे रुपये १०,०००/- प्रती माह प्रमाणे एप्रिल, मे व जून २०२१ या तीन महिन्यांचा रुपये ३०,०००/- कोविड भत्ता अदा करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमाक – ६७२ विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१००९६ दि.४/८/२०२१

कोविड-१९ अंतर्गत मनपाच्या वाय.सी.एम. हॉस्पिटलमधील विद्युत व्यवस्था/ पुरवठा २४ X ७ अखंडितपणे ठेवणेकामी वाय.सी.एम.एच. (विद्युत) विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी अतिशय कार्यक्षमपणे कोविड-१९ अंतर्गत कामकाज केलेले असल्याने खालील यादीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना माहे एप्रिल २०२१ ते जुन २०२१ (३ महिन्यांचा) प्रति माह व प्रत्येकी र.रू.१०,०००/- याप्रमाणे कोविड भत्ता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | अधिकारी / कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | दिलीप श्रीरंग धुमाळ | कार्यकारी अभियंता |
| २ | वासुदेव तुकाराम अवसरे | कनिष्ठ अभियंता |

| | | |
|---|---|---|
| ३ | मुकुंद श्रीधर पाटील | वीज पर्यवेक्षक |
| ४ | राघवेंद्र रामचंद्र धर्मकांबळे | वीजतंत्री |
| ५ | दिलीप शिवराम गुंजाळ | वीजतंत्री |
| ६ | रोहिदास बाजीराव गोळे | तारतंत्री |
| ७ | अमोल सतिश खराडे | तारतंत्री |
| ८ | अंकुश बजरंग माळी | जनित्र चालक |
| ९ | अनिल दत्तात्रय जगताप | जनित्र चालक |
| १० | धनाजी मारूती गावडे | जनित्र चालक |
| ११ | सुनिल शांताराम सुपे | जनित्र चालक |
| १२ | अनिल हिरामण नागापुरे | जनित्र चालक |
| १३ | अंकुश तुकाराम गुंड | मजूर |
| १४ | मधुकर राजाराम ठोंबरे | मजूर |
| १५ | गिरीष गोरखनाथ जाधव | मजूर |
| १६ | मारूती माणिक माने | मेंटनन्स हेल्पर |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत वायसीएम हॉस्पीटल मध्ये कोविड रुग्णांसाठी काम केलेले व करणारे बॉडी स्कॉड मधील सर्व कामगार कर्मचा-यांना सुध्दा इतर कर्मचा-यांप्रमाणे रुपये १०,०००/- प्रती माह प्रमाणे एप्रिल, मे व जून २०२१ या तीन महिन्यांचा रुपये ३०,०००/- कोविड भत्ता अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ १) मा.अतिरिक्त आयुक्त, (१) यांचेकडील पत्र
क्र.प्रशा/१/कावि/८५४/२०२१, दि.२८/०७/२०२१

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४४ दि.६/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट “अ”मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिध्द करण्यात आली होती. विशेषतज्ञ अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेलद्वारे कादपत्र तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते औनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारापैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दि.१८/०९/२०२० रोजी घेणेत आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाद्वारे अर्ज मागविण्याची पध्दती -:www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी -: अ.क्र. १ ते ३ वर नमुद पदांना र.रु.१५६०० - ३९१०० अँके ग्रेड पे. रु७६०० अ.क्र. ०४ ते ११ वर नमुद पदांना र.रु. १५६००- ३९१०० अँके ग्रेड पे ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग सोबतचे परिशिष्ठ -:“अ”नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रेअनुभव., विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेले आहेतसदर गुण तक्ता विचारात घेऊन . सोबतचे प्रपत्र‘अ’ नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे त्या यादीमधील विशेषतज्ञ अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता देणेत यावी.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत २१० मानधनावरील बालवाडी शिक्षिका तथा सेविका यांची सन २०१४ पासुन मानधनवाढ प्रलंबित असुन महासभेमध्ये खालील तक्त्याप्रमाणे सेवाजेष्ठता निहाय मानधनवाढ करणेत यावी यासाठी मान्यता देणेत यावी.

सदरहू सुधारीत मानधनवाढीनुसार र.रु. १,७७,१२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सत्त्याहत्तर लाख बारा हजार फक्त) एवढे वार्षिक आर्थिक बोजा वाढत असुन शिक्षण विभागातील इतर शिल्लक लेखाशिर्षकावरील र.रु. १,७७,१२,०००/- एवढी तरतुद म्हणून वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

## बालवाडी शिक्षिका पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढी संदर्भात येणारा आर्थिक बोजा

| सद्याचे मानधन | | | नियोजित प्रस्ताव २०२१ | | | येणारा आर्थिक बोजा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवाजेष्ठता | शिक्षिका संख्या | मानधन | सेवाजेष्ठता | शिक्षिका संख्या | मानधन मागणी | मानधनात पडणारा फरक | वार्षिक |
| ० ते ५ | ८ | ७,०००/- | ० ते ५ | ८ | १०,०००/- | ३,०००/- | २,८८,०००/- |
| ५.१ ते १० | ८ | ८,०००/- | ५.१ ते १० | ८ | १२,०००/- | ४,०००/- | ३,८४,०००/- |
| १०.१ ते १५ | ८४ | ९०००/- | १०.१ ते १५ | ८४ | १४,०००/- | ५,०००/- | ५०,४०,०००/- |
| १५.१ ते २० | ३५ | १०,०००/- | १५.१ ते २० | ३५ | १८,०००/- | ८,०००/- | ३३,६०,०००/- |
| २०.१ ते पुढे | ७५ | ११,०००/- | २०.१ ते २५ | ६९ | २०,०००/- | ९,०००/- | ७४,५२,०००/- |
| | | | २५.१ ते ३० | ३ | २५,०००/- | १४,०००/- | ५,०४,०००/- |
| | | | ३०.१ ते पुढे | ३ | ३०,०००/- | १९,०००/- | ६,८४,०००/- |
| **एकुण** | **२१०** | | | **२१०** | | | **१,७७,१२,०००/-** |

बालवाडी शिक्षकांचे काम अतिशय चांगले असुन कोविड मध्ये सोपविलेली जबाबदारी ८ ते १२ तास पर्यंत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून निष्ठेने पार पाडली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातुन विकासाला मानवी चेहरा देण्याचे विधायक कार्य आपले माध्यमातुन व्हावे. बालवाडी शिक्षिकांना नव्याने प्राव्हिडंड फंड, कायद्याप्रमाणे सर्व प्रकारच्या रजा व सुट्ट्या, प्रसुती रजा, वैद्यकीय लाभ, बालवाडी शिक्षिकांचा आकृतीबंध तयार करुन पद मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडून वेतनश्रेणीमध्ये बसवून त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम सेवेत सामाऊन घ्यावे तसेच सेवानिवृत्तीचा आर्थिक लाभ (र.रु. ५१,०००/-) त्वरीत लागु करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये शिक्षण विभागात आवश्यक असणारी पर्यवेक्षीय यंत्रणेची पदे सध्या कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे त्यांची सर्व कामे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत असणारे कर्मचारी करत आहेत. सदर कर्मचारी हे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कामकाज करत असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्वयं-अर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभागाचे प्रभावी नियंत्रण राहत नाही. सदर शाळांची संख्या २९४ असून या शाळांच्या बाबत शिक्षण विभागाकडे सतत फी संदर्भात व इतर अनेक बाबींविषयक तक्रारी प्राप्त होत असतात. श्री.विलास पाटील यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असून सद्य:स्थितीत ते फी संदर्भात व इतर अनेक बाबीविषयक तक्रार निवारणासंबंधी खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळा आणि पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभाग यांच्यात समन्वय साधण्याचे काम योग्यरित्या हाताळत आहेत. त्यामुळे श्री.विलास पाटील यांची खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर कायमस्वरूपी पर्यवेक्षक म्हणून नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ६७३ विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ १) मा.अतिरिक्त आयुक्त, (१) यांचेकडील पत्र
क्र.प्रशा/१/कावि/८५४/२०२१, दि.२८/०७/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४४ दि.६/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयांकरीता स्थायी आस्थापनेवरील गट "अ"मधील रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क.७३/२०१९ दि.१३/०९/२०१९ प्रसिध्द करण्यात आली होती. विशेषतज्ञ अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी उमेदवारांचे वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रवर्ग व समांतर आरक्षण इत्यादि विषयक कागदपत्रांची तपासणी होणे आवश्यक असल्याने ऑनलाईनद्वारे अर्ज केलेले उमेदवारांना जाहिर निवेदन, ई-मेलद्वारे कादपत्र तपासणी व मौखिक मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते औनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारापैकी मौखिक मुलाखतीस उपस्थित राहीलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडील संकेतस्थळावरुन उपलब्ध झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व मौखिक मुलाखती दि.१८/०९/२०२० रोजी घेणेत आलेल्या आहेत.

१) नामनिर्देशनाद्वारे अर्ज मागविण्याची पध्दती -:www.pcmcindia.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने

२) विशेषतज्ञ पदांची वेतनश्रेणी -: अ.क्र. १ ते ३ वर नमुद पदांना र.रु.१५६०० - ३९१०० अँके ग्रेड पे. रु७६०० अ.क्र. ०४ ते ११ वर नमुद पदांना र.रु. १५६००-३९१०० अँके ग्रेड पे ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)

३) नामनिर्देशनाव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल, उमेदवाराचे नाव, नेमणूक प्रवर्ग सोबतचे परिशिष्ठ -:"अ"नुसार

निवड समितीने उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेतल्या असून मुलाखती दरम्यान जाहिरातीमध्ये नमूद केलेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रेअनुभव., विषयातील ज्ञान इत्यादीनुसार उमेदवारांना गुण देण्यात आलेलेआहेत सदर गुणतक्ता विचारात घेऊन सोबतचे प्रपत्र'अ' नुसार पात्र उमेदवारांची निवड यादी सादर केली आहे त्या यादीमधील विशेषतज्ञ अभिनामाची गट अ मधील पदे सरळसेवेने भरण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत २१० मानधनावरील बालवाडी शिक्षिका तथा सेविका यांची सन २०१४ पासुन मानधनवाढ प्रलंबित असुन महासभेमध्ये खालील तक्त्याप्रमाणे सेवाजेष्ठता निहाय मानधनवाढ करणेत यावी यासाठी मान्यता देणेत येत आहे.

सदरहू सुधारीत मानधनवाढीनुसार र.रु. १,७७,१२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी सत्त्याहत्तर लाख बारा हजार फक्त) एवढे वार्षिक आर्थिक बोजा वाढत असुन शिक्षण विभागातील इतर शिल्लक लेखाशिर्षकावरील र.रु. १,७७,१२,०००/- एवढी तरतुद म्हणून वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**बालवाडी शिक्षिका पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढी संदर्भात येणारा आर्थिक बोजा**

| सद्याचे मानधन | | | नियोजित प्रस्ताव २०२१ | | | येणारा आर्थिक बोजा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवाजेष्ठता | शिक्षिका संख्या | मानधन | सेवाजेष्ठता | शिक्षिका संख्या | मानधन मागणी | मानधनात पडणारा फरक | वार्षिक |
| ० ते ५ | ८ | ७,०००/- | ० ते ५ | ८ | १०,०००/- | ३,०००/- | २,८८,०००/- |
| ५.१ ते १० | ८ | ८,०००/- | ५.१ ते १० | ८ | १२,०००/- | ४,०००/- | ३,८४,०००/- |
| १०.१ ते १५ | ८४ | ९०००/- | १०.१ ते १५ | ८४ | १४,०००/- | ५,०००/- | ५०,४०,०००/- |
| १५.१ ते २० | ३५ | १०,०००/- | १५.१ ते २० | ३५ | १८,०००/- | ८,०००/- | ३३,६०,०००/- |
| २०.१ ते पुढे | ७५ | ११,०००/- | २०.१ ते २५ | ६९ | २०,०००/- | ९,०००/- | ७४,५२,०००/- |
| | | | २५.१ ते ३० | ३ | २५,०००/- | १४,०००/- | ५,०४,०००/- |
| | | | ३०.१ ते पुढे | ३ | ३०,०००/- | १९,०००/- | ६,८४,०००/- |
| **एकुण** | **२१०** | | | **२१०** | | | **१,७७,१२,०००/-** |

बालवाडी शिक्षकांचे काम अतिशय चांगले असुन कोविड मध्ये सोपविलेली जबाबदारी ८ ते १२ तास पर्यंत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून निष्ठेने पार पाडली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातुन विकासाला मानवी चेहरा देण्याचे विधायक कार्य आपले माध्यमातुन व्हावे. बालवाडी शिक्षिकांना नव्याने प्राव्हिडंड फंड, कायद्याप्रमाणे सर्व प्रकारच्या रजा व सुट्ट्या, प्रसुती रजा, वैद्यकीय लाभ, बालवाडी शिक्षिकांचा आकृतीबंध तयार करुन पद मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडून वेतनश्रेणीमध्ये बसवून त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम सेवेत सामाऊन घ्यावे तसेच सेवानिवृत्तीचा आर्थिक लाभ (र.रु. ५१,०००/-) त्वरीत लागु करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये शिक्षण विभागात आवश्यक असणारी पर्यवेक्षीय यंत्रणेची पदे सध्या कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे त्यांची सर्व कामे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत असणारे कर्मचारी करत आहेत. सदर कर्मचारी हे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कामकाज करत असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील स्वयं-अर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभागाचे प्रभावी नियंत्रण राहत नाही. सदर शाळांची संख्या २९४ असून या शाळांच्या बाबत शिक्षण विभागाकडे सतत फी संदर्भात व इतर अनेक बाबींविषयक तक्रारी प्राप्त होत असतात. श्री.विलास पाटील यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेले असून सद्य:स्थितीत ते फी संदर्भात व इतर

अनेक बाबीविषयक तक्रार निवारणासंबंधी खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळा आणि पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण विभाग यांच्यात समन्वय साधण्याचे काम योग्यरित्या हाताळत आहेत. त्यामुळे श्री.विलास पाटील यांची खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांवर कायमस्वरूपी पर्यवेक्षक म्हणून नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीकडे मा.महापालिका सभेने विविध अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार मा.विधी समितीची मान्यतेकामी आवश्यक विषय ब-याचवेळा विधी समितीकडे येणारे विषय सदस्य पारित ठराव करुन मा.स्थायी समिती आणि मा.महापालिका सभेपुढे परस्पर ठेवून मान्यता घेतली जाते, त्यामुळे मा.विधी समितीकडे विषय सादर होत नाहीत. तरी, यापुढे मा.विधी समितीचे अधिकारात असलेले विषय परस्पर मा.स्थायी समिती किंवा मा.महापालिका सभेपुढे सदस्य पारित ठराव सादर करु नयेत आणि जरी सन्मा.सदस्यांच्या प्रस्ताव/उपसुचनेनुसार अशा विषयांना मान्यता देण्यात आली तरी असे विषय रितसर प्रशासना मार्फत मा.विधी समितीपुढे सादर करणेस मान्यता देणेत यावी.

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विलास मडिगेरी - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अंबरनाथ कांबळे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -६७४ विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/८/२०२१

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६७५ विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ १) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४६ दि.६/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.३० दापोडी आनंदवन येथील कृष्ठवसाहत ही झोपडपट्टी गेल्या ७० ते ८० वर्षापासून या ठिकाणी वसलेली असून या वसाहातीतील जवळपास १५० कुटुंबातील ३५० ते ४०० नागरिक हे बहुविकलांग कुष्ठरोगी व अपंग (महिला तसेच पुरुष) नागरिक आपल्या कुटुंबांसमवेत या ठिकाणी राहतात. या कुष्ठरुग्णांना शरिरावर जखमा असल्याकारणाने त्यांचे वेळोवेळी मलमपट्टी (वर्णोपचार) करण्याचे काम सौ.सुरेखा डॅनिअल दोडमणी तसेच सौ.लता अनिल कांबळे स्वतः कृष्ठपीडीत असून ते प्रमाणिकपणे त्यांची सुश्रुषा करीत असतात. सौ.सुरेखा डॅनिअल दोडमणी तसेच सौ.लता अनिल कांबळे त्यांचे आजवरचे काम व अनुभव विचारात घेवून नाशिक तसेच कल्याण डोंबिवली महापालिका धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत दापोडी येथील आनंदवन या बहुविकलांग कृष्ठरोगी व अपंग नागरिकांची वेळोवेळी ड्रेसिंग करण्याकरिता दरमहा रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी पंधरा हजार रु.फक्त) मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल - ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६७६ विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ १) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४८ दि.६/८/२०२१

शासन निर्णय क्र.बीसीस-२०१८/प्र.क्र./३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील बाब क्र.२ व ३ अंतर्गत समाविष्ठ तरतुदीनुसार दि.२५/०५/२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजु

असलेले कर्मचारी दि.२५/०५/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील या निर्णयानुसार पदोन्नती देणेबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाच्या जागा रिक्त असल्यामुळे श्री.सुनिलदत्त लहानू नरोटे यांची उपअभियंता या पदावर ०६ वर्षे सेवा पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या मनपा अस्थापनेवरील मंजुर रिक्त पदावर सेवा नियम २०२० तसेच आकृतीबंध २०२० नुसार व त्यातील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता, तांत्रिक व शैक्षणिक अर्हता, कार्यानुभव इत्यादी सर्व निकषास अनुसरुन पात्र ठरत आहेत. सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यकारी अभियंता स्थापत्य ही पदे रिक्त असल्याने श्री.सुनिलदत्त लहानू नरोटे, उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल - ५४ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८६/२०२१, दि.०७/०७/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. २७ दि.२६/७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्ते प्रस्तावित आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची

मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीच्या दृष्टीने सदरचे सेवा रस्ते विकसित होणे गरजेचे आहे.

त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- "मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६० दि. २९/०७/२०२१ मधील तसेच भोसरी हद्दीतुन दिघी हद्दीतील जाणारा सर्वच रस्ता ९.०० मीटर करणेस मान्यता देणेत येत आहे." हा मजकुर वगळण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील मंजुर विकास योजनेत ३०.०० मी. एच.सी.एम.टी.आर. रस्ता प्रस्तावित करण्यात आला असून त्या अनुषंगाने पूर्वेकडील स.नं. २८ व २९ ते पश्चिमेकडील स.नं. १६९ व १८८ या मधील ३० मी. एच.सी.एम.टी.आर. रस्त्याने बाधित क्षेत्राचे तसेच एच.सी.एम.टी.आर. रेल्वे स्टेशन या आरक्षणा मधील खाजगी जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

मा.विलास मडिगेरी - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक – ६७७ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८६/२०२१, दि.०७/०७/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. २७ दि.२६/७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि.१८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२

ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्ते प्रस्तावित आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीच्या दृष्टीने सदरचे सेवा रस्ते विकसित होणे गरजेचे आहे.

त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. १ ते ६, ८, ९, ११, १३ ते १८ व ७९ पैकी मधून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूकडील १२.०० मी. सेवा रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच "मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६० दि. २९/०७/२०२१ मधील तसेच भोसरी हद्दीतुन दिघी हद्दीतील जाणारा सर्वच रस्ता ९.०० मीटर करणेस मान्यता देणेत येत आहे." हा मजकुर वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मौजे पिंपळे सौदागर येथील मंजुर विकास योजनेत ३०.०० मी. एच.सी.एम.टी.आर. रस्ता प्रस्तावित करण्यात आला असून त्या अनुषंगाने पूर्वेकडील स.नं. २८ व २९ ते पश्चिमेकडील स.नं. १६९ व १८८ या मधील ३० मी. एच.सी.एम.टी.आर. रस्त्याने बाधित क्षेत्राचे तसेच एच.सी.एम.टी.आर. रेल्वे स्टेशन या आरक्षणा मधील खाजगी जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम-२०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व सदर भूसंपादनास येणा-या प्रत्यक्ष खर्चास व अदा करणेकामी मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ५४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६७८ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८५/२०२१, दि.०७/०७/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. २८ दि.२६/७/२०२१

चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील मंजूर विकास योजनेनुसार स.नं. ३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्ता प्रस्तावित आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे.

त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. ३९, ४०, ४३, ७२, ४६ व ६१ पैकी मधील पेट्रोल पंप ते मुकाई चौक रस्ता ते बापदेवनगर रेल्वे लाईन पर्यंत जाणारा १८.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६७९ विषय क्रमांक – १०
दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८३/२०२१, दि.०७/०७/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. २९ दि.२६/७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील मंजूर विकास योजनेनुसार स.नं. ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्ते प्रस्तावित आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून सदर रस्त्यांच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे.

त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८७, ८९ ते ९६ व गावठाणा पैकी मधील मुकाई चौक ते समीर लॉन्स पर्यंतचे १८.०० मी. व २४.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८० विषय क्रमांक – ११

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१८४/२०२१, दि.०७/०७/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ३० दि.२६/७/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीएस-१८०५।१०५०।प्र.क्र.७९५।०५।नवि-१३, दि. ३०।०५।२००८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस- १८०८।८९४।सीआर-१७२७।०९।नवि-१३, दि. १८।०८।२००९, व अधिसुचना क्र. टिपीएस- १८१२।१६०।सीआर-५८।१२, पुर्नरचना नं.।२७।१२ ईपी मंजूर/युडी-१३, दि. ०२।०३।२०१५ अन्वये विकास योजना मंजूर आहे. वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे किवळे येथील स.नं. ७३ मधील आरक्षण क्र. ४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या आरक्षणाने प्रस्तावित आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील मौजे किवळे ता. हवेली, जि.पुणे. येथील मंजूर विकास योजने मधील स.नं. ७३ मधील आरक्षण क्र. ४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) या आरक्षणाचा विकास करणेकामी कार्यकारी अभियंता, PMAY प्रकल्प विभाग यांचेकडून सदर आरक्षणाच्या जागांचे भूसंपादन करणेबाबतची मागणी आहे.

त्याकरिता मौजे किवळे येथील वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजने मधील स.नं. ७३ मधील आरक्षण क्र. ४/११९ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे (EWS) खालील जमिनीचे भूसंपादन, करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ सह व भूमी संपादन पुर्नवसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ५४ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.आमुका/९/कावि/१२८/२०२१ दि.७/७/२०२१
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६६५ दि.२९/७/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत शहरातील रस्ते यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाज करण्याकरिता मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३१६४ दि.११/०९/२०१८ अन्वये शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजाकरिता आरएफपी तयार करण्याकरिता मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शहरातील १८.०० मी व त्यापेक्षा मोठ्या रस्त्यांची साफसफाई ही यांत्रिकी पध्दतीने करणेकामी मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत तयार करण्यात आलेला आरएफपी मसुदा दि.७/०१/२०२१ रोजी सादर करण्यात आलेला आहे. सदर आरएफपीचे अनुषंगाने दि.१९/०१/२०२१ रोजी मा.आयुक्त सो. यांचे समक्ष सादरीकरण झालेले असून त्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या सूचना सल्लागार संस्थेस देण्यात आलेल्याहोत्या. त्यानुसार मे.टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा.लि. यांचे मार्फत दि.१९/०१/२०२१ रोजी सुधारित आरएफपी मसुदा सादर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची चार भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head officeचे २ पॅकेज व Northern side of head officeचे २ पॅकेज अशा रितीने ४ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.पॅकेज क्र. १ करिता २२१.६८ किमी, पॅकेज क्र. २ करिता २३६.०२ किमी, पॅकेज क्र. ३ करिता २३९.८६ किमी आणि पॅकेज क्र. ४ करिता २३०.६९ किमी इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length) ९२८.२५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी.पेक्षा जास्त रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Package Details | Contractual Sweeper (Required with Mechanized Sweeping Machines) | Driver (for Mechanical sweepers, transport vehicles & water tankers) | Operator for Mechanical Sweepers | Helper for transport vehicles and water tanker | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Package – 1 (Southern side of head office Ward – ABDG) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| 2 | Package – 2 (Southern side of head office Ward – BDGH) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Package – 3 (Northern side of head office Ward – CHE) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| 4 | Package – 4 (Northern side of head office Ward – ACF) | 96 | 10 | 7 | 3 | 116 |
| **Total** | | **384** | **40** | **28** | **12** | **464** |

तसेच यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजा करिता आरएफपी मध्ये २४ स्विपींग मशीन ८ हूक लोडर व ४ पाण्याचे टँकर्सची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, वाहनांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.४६३.९४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) निविदा कालावधी हा ७वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधानआहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब)नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु.४६३.९४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्षखर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काहीबदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्षखर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना राहतील.

३) निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

४) यापुर्वी मा. स्थायी समितीकडील ठराव क्र.८३५८ दि.०८/०२/२०२१ अन्वये सदरच्या विषयास मान्यता देवून, सदरचा विषय मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता मिळणेकामी शिफारस करणेत आलेली होती. तथापी मा. महापालिका सभा ठरावक्र.६०९ दि.१८/०३/२०२१ अन्वये दफ्तरी दाखल करणेत आलेला होता.

५) तथापीI) Construction & Demolition Waste Arrangement Rule 2016, (II) Hazardos& other waste (Management &Transboundry Management) Rule 2016 (III) Solid Waste Management Rule 2016 (IV) E-Waste (Management) Rule 2016 (V) Biomedical Waste (Management &Hanling) Rule 2016 (VI) Plastic Waste Management Rule 2016या व्यतिरिक्त मनपा परिसरामध्ये पर्यावरण संरक्षणाचे दृष्टीने विविध कायदे अस्तित्वात असून त्यानुसार वेळोवेळी योग्यती कार्यवाही करणे मनपास बंधनकारक आहे.(Environment Protection Act 1986, Waste Prevention & Control Pollution) Act 1974 Air (Prevention & Control of Pollution) Act 1981तसेच स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत दरवर्षी केंद्रामार्फत शहराची पाहणी करणेकामी प्रतिनिधी येत असतात. त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, शौचालय साफसफाई, रस्ते साफसफाई इ. सर्व

साफसफाईच्या कामांचे मूल्यांकन केले जाते.तसेच माझी वसुंधरा अंतर्गत गुणांकन केले जाते. त्यानुसार शहरातील रस्ते यांत्रिक पध्दतीने साफसफाई (रोड स्वीपरद्वारे) कामकाज करणे हे आवश्यक आहे.

६) महासभा, विविध विषय समिती कामकाज नियम मधील मुद्दा क्र. ७६ नुसार सभेस हजर असलेल्या सभासदांपैकी किमान निम्म्या सदस्यांनी पुनर्विचाराच्या प्रस्तावाच्या बाजूने मत दिले असेल व अशी मते किमान पाच असतील, त्याखेरीज समितीने एकदा निकालात काढलेला कोणताही प्रश्न ३ महिन्यांच्या मुदतीत पुन्हा विचारार्थ घेता येणार नाही. असे नमूद आहे. त्यानुसार सदरचा विषय हा दप्तरी दाखल होऊन, ३ महिने पुर्ण झालेले आहेत.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळ्या जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आर.एफ.पी. नुसार ७ वर्षे कालावधी करिता निविदा प्रक्रिया राबविणे कामी व त्यापोटी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मान्यता देणेत यावी.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विलास मडिगेरी – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.अंबरनाथ कांबळे – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर – विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे परत विषय आणू नये.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६८१ विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.आमुका/९/कावि/१२८/२०२१ दि.७/७/२०२१
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६६५ दि.२९/७/२०२१ अन्वये.

विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-५४ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८२ विषय क्रमांक – १३
दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.वैद्य/०९/कावि/४१२४/२०२१ दि.५/८/२०२१

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा COVID -19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता कामकाजाचे नियोजन करून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने COVID -19 चे संदर्भात शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासननिर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे मा. महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार वैद्यकीय विभागाकडे सोबतचे प्रपत्र "**अ**" नुसार COVID -19 चे संदर्भात शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासननिर्णय, आदेश, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे आदींची माहिती सन्मा. सदस्यांना होणेकामी सभा कामकाज नियमातील तरतुदीनुसार शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेली पत्रे अवलोकन करणेत आले.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-५४ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक – २०/८/२०२१

विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.अ.वि.दु/२/२कावि/८३/२०२१ दि.९/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे दालनामध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी Dish T.V. यंत्रणा पुरविणे व त्याचे मासिक बील अदा करणे तसेच मा.पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांस अधिकत्तम वापर मर्यादा निश्चित करणे.

तपशील- पिंपरी चिंचवड पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे दालनामध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी मे.टाटा स्काय, मे एअरटेल अशा प्रकारच्या Dish T.V. सुविधा पुरविणा-या कंपन्याकडून सदर सुविधा घेणे व त्याचे मासिक बील अदा करणे तसेच मा.पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांस खालील प्रमाणे सुविधा मंजूर करणेस तसेच मासिक अधिकत्तम वापर मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

१) सदर सुविधा देय मा.पदाधिकारी व मा. अधिकारी

मा.पदाधिकारी – मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा.पक्षनेता, मा.विरोधीपक्षनेता, मा. अध्यक्ष-सर्व क्षेत्रीय कार्यालय यांची दालने

मा. अधिकारी – जे अधिकारी सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पे-बॅंड एस-२५ किंवा त्यापेक्षा जादा वेतनश्रेणीत आहेत असे सर्व अधिकारी.

२) अधिकत्तम मासिक वापर मर्यादा व बील अदायगी खालीलप्रमाणे देय राहील.

(अ) उभारणीचा (Installation Charges) चा खर्च १०० टक्के अंदाजे र.रु. २०००/- किंवा प्रत्यक्ष

(ब) मासिक बील अदायगी र.रु. ५००/-

३) तरतूद-

सदरचे कामासाठी अणु विदयुत व दूरसंचार विभागाचे सन २०२१-२२ महसूली अंदाजपत्रकात “अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे “ अशा अभिनामाचे उपलेखाशिर्षक नव्याने निर्माण करणेस व त्यावर खालील प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | मूळ तरतूद | वाढ | घट | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ६ / १९४-१९५ | सीसीटीव्ही यंत्रणा पुरविणे व चालन करणे | र.रु.३५,००,००० | - | र.रु.२,००,००० | र.रु.३३,००,००० |
| १० / १९४-१९५ | अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्युज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे | - | र.रु. २,००,००० | - | र.रु.२,००,००० |

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे -  मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- विविध विभागांमध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी Dish T.V. यंत्रणा खालिल अधिका-यांना कार्यालयांना व रूग्णालयांनाही पुरविणेत यावी.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ अंतर्गत असलेल्या शहर अभियंता, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, उपायुक्त, नगरसचिव, मुख्य लेखा परिक्षक या पदांनाही सदर सुविधा पुरविणेस मान्यता देण्यात यावी.

२) निवडणूक विभाग, मध्यवर्ती पूरनियंत्रण तथा वायरलेस - दूरध्वनी कक्ष, माहिती व जनसंपर्क कक्ष, पत्रकार कक्ष, सर्व अग्निशमन केंद्रे, सर्व गट नेते, सर्व विषय समित्यांचे अध्यक्ष, सर्व रूग्णालये (मागणी नूसार जास्तीत जास्त ५ कनेक्शन प्रती रूग्णालय), या ठिकाणी देखील सदर सुविधा पुरविण्यास मान्यता देण्यात यावी.

सदर कामासाठी अणु विद्युत व दूरसंचार विभागाचे सन २०२१-२२ चे महसूली अंदाजपत्रकात “अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे” अश्या अभिनामाचे उपलेखाशिर्षक नव्याने निर्माण करणेस व त्यावर खालिल प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | मूळ तरतूद | वाढ | घट | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ६/१९४-१९५ | सीसीटीव्ही यंत्रणा पुरविणे व चालन करणे | र.रू.३५,००,००० | - | र.रू.१५,००,००० | र.रू.२०,००,००० |
| १०/१९४-१९५ | अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे | - | र.रू.३,७०,००० | - | र.रू.३,७०,००० |
| ९/१९४-१९५ | सर्व कार्यालय ISDN PRI Line ने जोडणे व बील अदा करणे. | र.रू.७,७०,००० | र.रू.११,३०,००० | - | र.रू.१९,००,००० |

मा.विलास मडिगेरी -  मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.सुजाता पालांडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक – ६८३ विषय क्रमांक – १४

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.अ.वि.दु/२/२कावि/८३/२०२१ दि.९/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे दालनामध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी Dish T.V. यंत्रणा पुरविणे व त्याचे मासिक बील अदा करणे तसेच मा.पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांस अधिकत्तम वापर मर्यादा निश्चित करणे.

तपशील- पिंपरी चिंचवड पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे दालनामध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी मे.टाटा स्काय, मे. एअरटेल अशा प्रकारच्या Dish T.V. सुविधा पुरविणा-या कंपन्याकडून सदर सुविधा घेणे व त्याचे मासिक बील अदा करणे तसेच मा.पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांस खालील प्रमाणे सुविधा मंजूर करणेस तसेच मासिक अधिकत्तम वापर मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे.

१) सदर सुविधा देय मा.पदाधिकारी व मा. अधिकारी

मा.पदाधिकारी – मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा.पक्षनेता, मा.विरोधीपक्षनेता, मा. अध्यक्ष-सर्व क्षेत्रीय कार्यालय यांची दालने

मा. अधिकारी – जे अधिकारी सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पे-बॅंड एस-२५ किंवा त्यापेक्षा जादा वेतनश्रेणीत आहेत असे सर्व अधिकारी.

२) अधिकत्तम मासिक वापर मर्यादा व बील अदायगी खालीलप्रमाणे देय राहील.

अ) उभारणीचा (Installation Charges) चा खर्च १०० टक्के अंदाजे र.रु. २०००/- किंवा प्रत्यक्ष

(ब) मासिक बील अदायगी र.रु. ५००/-

३) तरतूद-

सदरचे कामासाठी अणु विदयुत व दूरसंचार विभागाचे सन २०२१-२२ महसूली अंदाजपत्रकात "अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे " अशा अभिनामाचे उपलेखाशिर्षक नव्याने निर्माण करणेस व त्यावर खालील प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | मूळ तरतूद | वाढ | घट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ६ / १९४- | सीसीटीव्ही यंत्रणा पुरविणे व चालन | र.रु.३५,००,००० | - | र.रु.२,००,००० | र.रु.३३,००,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९५ | करणे | | | | |
| १० / १९४-१९५ | अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्युज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे | - | र.रु. २,००,००० | - | र.रु.२,००,००० |

तसेच विविध विभागांमध्ये तातडीच्या बातम्या पहाण्यासाठी Dish T.V. यंत्रणा खालिल अधिका-यांना कार्यालयांना व रूग्णालयांनाही पुरविणेस मान्यता देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ अंतर्गत असलेल्या शहर अभियंता, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, उपायुक्त, नगरसचिव, मुख्य लेखा परिक्षक या पदांनाही सदर सुविधा पुरविणेस मान्यता देण्यात येत आहे.

२) निवडणूक विभाग, मध्यवर्ती पूरनियंत्रण तथा वायरलेस - दूरध्वनी कक्ष, माहिती व जनसंपर्क कक्ष, पत्रकार कक्ष, सर्व अग्निशमन केंद्रे, सर्व गट नेते, सर्व विषय समित्यांचे अध्यक्ष, सर्व रूग्णालये (मागणी नूसार जास्तीत जास्त ५ कनेक्शन प्रती रूग्णालय), या ठिकाणी देखील सदर सुविधा पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामासाठी अणु विद्युत व दूरसंचार विभागाचे सन २०२१-२२ चे महसूली अंदाजपत्रकात "अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे" अश्या अभिनामाचे उपलेखाशिर्षक नव्याने निर्माण करणेस व त्यावर खालिल प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष | मूळ तरतूद | वाढ | घट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ६/१९४-१९५ | सीसीटीव्ही यंत्रणा पुरविणे व चालन करणे | र.रू.३५,००,००० | - | र.रू.१५,००,००० | र.रू.२०,००,००० |
| १०/१९४-१९५ | अधिकारी/पदाधिकारी यांस टी.व्ही.न्यूज चॅनल सुविधा पुरविणे व बील अदा करणे | - | र.रू.३,७०,००० | - | र.रू.३,७०,००० |
| ९/१९४-१९५ | सर्व कार्यालय ISDN PRI Line ने जोडणे व बील अदा करणे. | र.रू.७,७०,००० | र.रू.११,३०,००० | - | र.रू.१९,००,००० |

अनुकूल- ५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८४ विषय क्रमांक – १५

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.पत्रक/०३/कावि/०८/२०२१ दि.६/८/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल. अशा पध्दतीने महानगरपालिकासमोर सादर करणेची तरतुद आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०२०-२१ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व आवश्यक माहिती संबंधित विविध विभागाकडून संकलित करुन तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर ठेवणे आवश्यक आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०२०-२१ चा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल मा.महापलिका सभेसमोर ठेवणेत आला.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८५ विषय क्रमांक – १६

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ- १**) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्था/बीआरटीएस/६३९/२०२१ दि.१०/८/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजुर विकास आराखड्या अंतर्गत वाल्हेकरवाडी चौक ते सांगवी किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतच्या ४५ मी .रुंद स्पाईन रस्ता विकसीत करणे व पवना नदीवर महानगरपालिका बोट क्लब जवळ पूल बांधणेचे नियोजन आहे .सदर प्रकल्पामध्ये निगडी प्राधिकरण येथून येणारा मनपाच्या विकास आराखड्या मधील ४५मी स्पाईन रस्ता वाल्हेकरवाडी मुख्य रस्ता पासून पवना नदी पुढे पशुसंवर्धन विभागाच्या जागेतून ताथवडे येथील सांगवी किवळे रस्त्यावरील डेअरी फार्म चौकापर्यंतचा रस्ता विकसीत करणेत येणार आहे.सदर रस्त्यामुळे हिंजवडी आयटी पार्क ,चाकण तळेगाव औद्योगिक बसाहत व नाशिक मार्गाकडे जाणा-या तसेच थेरगाव , काळेवाडी ,सांगवी ,वाकड ,पिंपळे निलख भागातील नागरिकांना ये जा करणे सोयीचे होणार आहे .डांगे चौकातील वाहतुक कोंडी कमी होणार आहे तसेच इंधन व वेळेची बचत देखील होणार आहे.त्यानुषंगाने पशुसंवर्धन विभागाच्या जागेमधुन मनपा विकास योजनेतील जागा मनपाकडे हस्तांतरीत करणेबाबत विनंती वेळोवेळी पत्राद्वारे संबंधित विभागाकडे करण्यात आलेली आहे. त्या दरम्यानच्या चर्चेत दि . ०५/०६/२०१८ रोजी मा.सचिव ,पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र राज्य व मा .आयुक्त ,पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या सोबतच्या संयुक्त बैठकीत झालेल्याचर्चेनुसार पशुसंवर्धन विभागाच्या जमिनीचे सर्वेक्षण करुन पर्यायी संरेखन तयार करणेबाबत सुचविले होते.त्यासअनुसरुन पशुसंवर्धन खात्याचे नियोजनानुसारविकास आराखड्यातील रस्त्याचे संरेखनात सुचविल्याप्रमाणे बदल करून ते अंतिम करण्यात आले आहे .याबाबत मा .विभागीय आयुक्त ,पुणे विभाग यांचे समवेत दि .१७/०२/२०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालय येथील बैठकीमध्ये पुणे कार्यालयातील अधिका-यांनी सदर संरेखनास सहमती दर्शवली आहे.

तथापी मनपाने यापुर्वी विकास कामांसाठी ताब्यात घेतलेल्या जागांबाबत मा.आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र, पुणे यांचे पत्राचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे यापूर्वी वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील स.नं.२०,२४ व २५ मधील २.४० हेक्टर क्षेत्र जकात नाका, बोट क्लब व ४५ मी., ३४.३५ मी. रस्ता रुंदीकरणासाठी हस्तांतरित केलेली आहे. यापुर्वी हस्तांतरीत केलेल्या जागेच्या मोबदल्यात मनपामार्फत करून द्यावयाच्या विविध बांधकामांसाठी पशुसंवर्धन विभागाने खर्च केलेली र.रू.१.२५ कोटी इतकी असून पशुसंवर्धन खात्याने सन २००१ मध्ये सदरचा खर्च केलेला आहे. सदर कामास बरीच वर्ष झाली असून त्याची किंमत आज रोजी निश्चितच र.रू.१.२५ कोटी पेक्षा अधिक आहे.

तसेच वाल्हेकरवाडी चौक ते औंध-रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतचा ४५ मी. रूंद स्पाईन रस्ता विकसित करण्यासाठी वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील पशुसंवर्धन प्रक्षेत्राची हस्तांतरीत करावयाचे ४.४८ हे. क्षेत्र (नदीवरील पुल व रस्त्यासाठी) तसेच ०.७० हे. मैलाशुद्धीकरण

केंद्रासाठी असे एकूण ५.१८ हे. क्षेत्राचे महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त दर सुचीनुसार (Ready Reckner Rate)र.रू.१८.५३ कोटी इतके मुल्यांकन होत आहे.

जागा हस्तांतरित करण्याच्या मोबदल्यात खालील कामे प्रस्तावित करण्यात आली आहे.

१) मा खासदार श्री.श्रीरंग ऊर्फ आप्पा बारणे यांचे निवासस्थान ते बोट क्लब पर्यंतच्या संरक्षक भिंतीची उंची ३ फूट आर.सी.सी. मध्ये बांधकाम करून वाढवण्यात यावी व त्यावर ३ फूट Y-वाय फेंसिंग करून देण्यात यावे.

२) प्रक्षेत्रामधील अंतर्गत ६ कि.मी. रस्ते सिमेंट काँक्रीटचे करून मिळावेत.

३) पंपहाऊस दुरुस्ती करण्यात यावी व पाईपलाईन बदलून देण्यात यावी.

४) प्रक्षेत्राकरिता नवीन कार्यालयाचे बांधकाम करून मिळावे.

५) प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचा-यांकरिता एकूण ४७ निवासस्थाने बांधकाम करून मिळावे.

वरील बाबींचा महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्याकडील सन २०२०-२१ च्या राज्यस्तरीय दरसुचीनुसार र.रू.२२.०३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच, यापुर्वी हस्तांतरीत केलेल्या जागेच्या मोबदल्यात मनपामार्फत करून द्यावयाच्या विविध बांधकामांसाठी पशुसंवर्धन विभागाने खर्च केलेली र.रू.१.२५ कोटी इतकी असून एकुन र.रु १९.७८ कोटी रक्कमेची परीगणना केल्यास हस्तांरीत करावयाच्या जागेच्या मोबदल्यात प्रक्षेत्रावर करावयाच्या कामाची रक्कम रु. २.२५ कोटीने जास्त आहे. पशुसंवर्धन खात्याने सन २००१ मध्ये सदरचा खर्च केलेला आहे. सदर कामास बरीच वर्ष झाली असून त्याची किंमत आज रोजी निश्चितच र.रू.१.२५ कोटी पेक्षा अधिक आहे.

वरील बाबींचा विचार करता वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील ५.८१ हेक्टर जागा हस्तांतरित करण्याच्या मोबदल्यात प्रक्षेत्राकडे अतिरिक्त निधीची मागणी न करता वर नमुद २२.०३ कोटी रक्कमेची सर्व कामे प्रक्षेत्रास करुन देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच मनपाने सादर केलेला र.रु ९९.५० रक्कमेचा उड्डाणपुल बांधणेचा आराखड्यास मान्यता दर्शविली आहे. तसेच सदर उड्डाणपुलास Noise वDust Barrier लावणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने सुधारित हमीपत्रक पशुसंवर्धन विभागाकडे सादर केल्यास सदरचा जागा हस्तांतरणाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यात येणार आहे. मा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी प्रक्षेत्रावर करुन द्यावयाच्या कामांबाबत मागील अनुभव पाहता जागा प्रत्यक्ष हस्तांतरीत करण्यापुर्वी उक्त प्रस्तावित १ते ५ कामांपैकी अ.क्र . १.ते४ वरील कामे पुर्ण करणेस व क्र.५ वरील कामांसाठी प्लिंथ पर्यत काम पुर्ण करणेच्या अटीस अधिन राहुन महानगरपालिकेने मागणी केलेली ५.१८ हेक्टर (४.४८ हे. +०.७०हे.) जागा देण्यास पशुसंवर्धन विभागाची हरकत नसल्याचे कळविले आहे.

सबब, पशुसंवर्धन विभागाने पत्रात नमुद केल्यानुसार वळू माता प्रक्षेत्र ताथवडे येथील ५.८१ हेक्टर जागा हस्तांतरित करण्याच्या मोबदल्यात करावयाच्या कामांचे विस्तृत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, त्याचा खालील तक्त्यात उल्लेख करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | कामाचे वर्णन | लांबी (मी.) | रुंदी(मी.) | उंची(मी.) | खर्च र.रु. (कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १) | मा खासदार श्री.श्रीरंग ऊर्फ आप्पा बारणे यांचे निवासस्थान ते बोट क्लब पर्यंतच्या संरक्षक भिंतीची उंची ३ फूट आर.सी.सी. मध्ये बांधकाम करून वाढवण्यात यावी व त्यावर ३ फूट Y-वाय फेंसिंग करणे. | ४५०.० | - | - | ०.५० |
| २) | प्रक्षेत्रामधील अंतर्गत ६ कि.मी. रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करणे. | ६०००.० | ६.० | | १३.६५ |
| ३) | पंपहाऊस दुरुस्ती करण्यात यावी व पाईपलाईन बदलणे. | - | - | - | ३.० |
| ४) | प्रक्षेत्राकरिता नवीन कार्यालयाचे बांधकाम करणे. | २५०.० चौ.मी | - | - | १.१२ |
| ५) | प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचा-यांकरिता एकूण ४७ निवासस्थाने बांधकाम करणे. | १३६६.० चौ.मी | - | - | ३.७६ |
| | एकुण | | | | २२.०३ |

मनपाचे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात वाल्हेकरवाडी चौक ते औंध-रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक, ताथवडे पर्यंतचा विकास आराखड्यातील ४५.०० मी. रूंद स्पाईन रस्ता विकसीत करणेच्या कामासाठी खालीलप्रमाणे अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता | तरतूद सन २०२०-२१ |
|---|---|---|---|
| | स्पाईन रस्ता वाल्हेकरवाडी ते थेरगाव नियोजित पुलापर्यंत पशुसंवर्धन खात्याच्या जागेमधून ४५.०० मी.रस्ता विकसीत करणे. भाग.१ | ३५.०० कोटी | १०.०० कोटी |
| | स्पाईन रस्ता वाल्हेकरवाडी ते ताथवडे या रस्त्यावर थेरगाव बोट क्लब जवळ पशुसंवर्धन खात्याच्या जागेमधून पवना नदीवर पुल बांधणे. भाग.२ | १८०.०० कोटी | १०. ०० कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| | स्पाईन रस्ता वाल्हेकरवाडी ते थेरगाव नियोजित पुलापासून ताथवडे चौकापर्यंत ४५.०० मी.रस्ता विकसीत करणे. भाग.३ | ४०.०० कोटी | ६. ०० कोटी |
| **एकूण र.रू.** | | **२५५.०० कोटी** | **२६. ०० कोटी** |

वरीलप्रमाणे अंदाजपत्रकात सुचविलेल्या कामाच्या नावात बदल करून एकत्रित खालील कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता | तरतूद सन २०२०-२१ |
|---|---|---|---|
| | वाल्हेकरवाडी चौक ते औंध-रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक, ताथवडे पर्यंतचा विकास आराखड्यातील ४५.०० मी. रूंद स्पाईन रस्ता व पवना नदीवरील पुल बांधणे. | २२५.०० कोटी | २०.०० कोटी |
| | पशुसंवर्धन प्रक्षेत्राच्या जागेच्या बदल्यात पशुसंवर्धन प्रक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात विविध विकास कामे करणे. | ३०.०० कोटी | ६. ०० कोटी |
| **एकूण र.रू.** | | **२५५.०० कोटी** | **२६. ०० कोटी** |

वर उल्लेख केल्याप्रमाणे दोन्ही कामे मनपाच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात नमुद केलेल्या ३ कामांऐवजी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावित कामांसाठी त्यासमोर दर्शविण्यात आलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता व तरतुदीस मान्यता देणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८६ विषय क्रमांक – १७

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.वैद्य/९/कावि/४२१०/२०२१
दिनांक ११/०८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरीकांना उत्कृष्ट आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणेचे दृष्टीने महापालिकेमार्फत पुरविल्या जाणा-या आरोग्य सेवांचे सोशल इम्पॅक्ट बॉण्ड (SIB) च्या माध्यमातुन बळकटीकरण आणि सुधारणा करणेत येऊन महानगरपालिकेचे दवाखाना/रुग्णालयामार्फत शहरातील नागरीकांना उत्कृष्ट आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणेचे दृष्टीने तसेच विहीत प्रकल्पाअंतर्गत गुंतवणुकीची परतफेड महानगरपालिकेने निश्चित केलेली उद्दीष्टे साध्य झाल्यावर करणेत येणार असलेमुळे महापालिकेने ह्याकरीता प्रथमत: अर्थसंकल्पिय तरतुद करणेस व प्रकल्प संदर्भातील विषयावर निर्णय घेण्यास गठीत समितीस निर्णय घेणेचे सर्व अधिकार मा.महापालिका सभेच्या मान्यतेने प्रदान करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरीकांना उत्कृष्ट आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणेचे दृष्टीने महापालिकेमार्फत पुरविल्या जाणा-या आरोग्य सेवांचे सोशल इम्पॅक्ट बॉण्ड (SIB) च्या माध्यमातुन बळकटीकरण आणि सुधारणा करण्यासाठी महापालिकेने संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या (UNDP) दिल्ली कार्यालयासोबत सामंजस्य करार (MOU) केला आहे. सोशल इम्पॅक्ट बॉण्ड (SIB) ही नाविन्यपूर्ण वित्त पुरवठा कार्यतंत्र पध्दत असुन ह्यामध्ये सदर प्रकल्पासाठी निवडले गेलेले गुंतवणूकदार आरोग्य सेवा केंद्रे सुधारण्यासाठी अग्रिम गुंतवणुक करतील व ह्या गुंतवणुकीची परतफेड महानगरपालिकेने निश्चित केलेली उद्दीष्टे साध्य झाल्यावर केली जाईल. महापालिकेने ह्याकरीता अर्थसंकल्पिय तरतुद करणे आवश्यक असून उद्दीष्टे साध्य न झाल्यास गुंतवणूकदाराला पैस न मिळण्याची जोखीम उचलावी लागेल.

यूएनडीपी, संयुक्त राष्ट्राच्या अंतर्गत बहुस्तरीय विकास करणारी अग्रणी संस्था असून आरोग्य केद्रांचे सक्षमीकरण हे यांचे महत्वाचे कार्यक्षेत्र आहे. सामंजस्य करारातील तरतुदीनुसार यूएनडीपी महापालिकेला आरोग्य केंद्रांच्या सुधारणेसाठी लागणा-या योजना आणि त्यांची अंमलबजावणी ह्यासाठी तांत्रिक सहाय्य करत आहे. ह्याव्यतिरिक्त सदर प्रकल्पाची उद्दीष्टे निवडणे आणि आरोग्य सेवा केंद्रांच्या बळकटीकरण व सुधारणांसाठी योजनेचे टप्पे निर्धारीत करणे यासाठी यूएनडीपीने अनुदान देऊ केले आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत मुल्यमापन करणे, योजना आखणे, जोखीम घेऊ शकणारे गुंतवणुकदार शोधण्यात मदत करणे आणि महापालिकेकरिता प्रकल्प अंमलबजावणी करणे यासाठी यूएनडीपीने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे पॅलेडियम कन्सल्टींग इंडिया प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

त्यांनी महापालिकेचे आरोग्य सेवा केद्रांच्या बळकटीकरण व सुधारणांसाठी ३ वर्षे कालावधीकरिता अंदाजे १०० कोटी रुपये गुंतवणुक येणे अपेक्षित असलेबाबतचा अंदाज वर्तवला आहे. सदरचे गुंतवणुकीद्वारे खालील परिणाम साधणे शक्य आहे.

१) एनएबीएच मान्यतेद्वारे सर्व ४१ आरोग्य केंद्रामध्ये सुधारणा – वैद्यकीय सेवा प्रक्रिया सुरळीत होऊन रुग्णालय कर्मचा-यांना दैनंदिन कामकाजाचे परिणामकाराक व्यवस्थापन करण्यास मदत होईल व त्यामुळे आरोग्य सेवा केंद्राच्या उपचार करण्याच्या क्षमतेत रुग्ण वाढ होऊन रुग्णांना सुधारित सेवांचा लाभ उपलब्ध करुन देणे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत महापालिकेला सध्या मिळणा-या ८०% भरपाईचे प्रमाण एनएबीएचच्या मान्यतेनंतर १००% एवढे होईल.

२) द्वितीय स्तरावरील ७ रुग्णालयात प्रसुतीपूर्व आणि प्रसूतीनंतर लागणा-या सुविधांचे बळकटीकरण करुन ह्या सुविधांचा लाभ घेणा-या रुग्णांची संख्या वाढविणे तसेच रुग्णालयात लागणारे साहित्य, प्रयोगशाळा तसेच इतर सहाय्यभूत यंत्रणाद्वारे प्रसूती सेवामध्ये सुधारणा केल्याने वाय.सी.एम. रुग्णालयावरील रुग्णसंख्येचा अतिरिक्त भार कमी होणेस मदत होईल.

३) वायसीएम रुग्णालयामध्ये इतर स्पेशालिस्ट ट्रीटमेंटची क्षमता वाढविणे – सदर रुग्णालयात दोन अतिरीक्त शश्त्रक्रीया उभारणी व पूरक सेवा उपलब्ध करुन त्यांचा वापर हाडांच्या व इतर शश्त्रक्रियांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी होऊ शकेल. त्यामुळे शश्त्रक्रियेसाठी प्रतीक्षा (Waiting) कालावधी कमी होऊ शकेल.

सदर प्रकल्प अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करणे आवश्यक आहे.

१) महापालिका आयुक्त
२)अतिरीक्त आयुक्त (१)
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी
४) वैद्यकीय विभाग प्रमुख
५) वायसीएमएच रुग्णालयाचे डीन

सदर प्रकल्प अंमलबजावणीसाठी उक्त समितीस खालील प्रमाणे अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

- गुंतवणूकदाराची नेमणूक करण्यासाठी निविदा / एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट / विनंती प्रस्ताव मागविणे.
- आरोग्य केंद्रांच्या सुधारणा व बळकटीकरणासाठीची उद्दीष्टे निश्चित करणे.
- गुंतवणूकदारासोबत करण्याच्या करार, कामगिरीचे मूल्यमापन, अटी आणि शर्ती यांची रचना निश्चित करणे.
- प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी गुंतवणूकदार, युएनडीपीने नियुक्त केलेले इम्प्लिमेंटेशन पार्टनर (पॅलेडियम) तसेच मॉनिटरिंग एजन्सी, स्पेशालिस्ट एजन्सीसारख्या इतर मदत करणा-या संस्थांबरोबर त्रिपक्षीय करार करणे.
- ठरवलेली उद्दीष्टे साध्य झाल्यावर गुंतवणूकदाराला प्रिमीयम देण्याबाबतचा निर्णय घेणे.
- आवश्यकता भासल्यास प्रकल्पासाठी एस्क्रो खाते उघडणे.

- योग्य कर्मचारी धोरण आखणे, आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी कर्मचा-यांची भरती करणे, आरोग्य सेवाकेंद्रे सुधारण्यासाठी योजना राबवणे.
- एनएबीएच आणि इतर मान्यतेसाठी संबधित प्राधिकरणाकडे अर्ज करणे.
- पाच नवीन द्वितीय स्तरावरील रुग्णालये कार्यान्वित विविध पध्दतींबाबत निर्णय घेणे.
- पाच नवीन द्वितीय स्तरावरील रुग्णालयांच्या कामाची व्याप्ती निश्चित करणे.
- कायदेशीर समुपदेशकाची नियुक्ती अंतिम करुन मंजूर करणे आणि अशा व्यक्ती/एजन्सींना त्यांच्या वैयक्तिक नियुक्ती पत्रांमध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार मोबदला देणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरीकांना उत्कृष्ट आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणेचे दृष्टीने महापालिकेमार्फत पुरविल्या जाणा-या आरोग्य सेवांचे सोशल इम्पॅक्ट बॉण्ड (SIB) च्या माध्यमातुन बळकटीकरण आणि सुधारणा करण्यासाठी विहीत प्रकल्पाअंतर्गत गुंतवणुकीची परतफेड महानगरपालिकेने निश्चित केलेली उद्दीष्टे साध्य झाल्यावर करणेत येणार असलेमुळे महापालिकेने ह्याकरीता प्रथमत: अर्थसंकल्पिय तरतुद करणेस व वरील प्रमाणे समिती गठीत करुन प्रकल्प संदर्भातील विषयावर निर्णय घेणेचे सर्व अधिकार प्रदान करणे या बाबींस मान्यता देणेत येत आहे.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८७ विषय क्रमांक – १८
दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**समित्यांचे अहवाल**

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्र. १५ दि.२/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा. अॅड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८८ विषय क्रमांक – १९

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.महीला व बालकल्याण समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.१० दि.२२/४/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.११ दि.१४/५/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) कार्यपत्रिका क्र.१२ दि.२४/६/२०२१ व दि.८/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६८९ विषय क्रमांक – २०

दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

कार्यपत्रिका क्रमांक १४ दि.६/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६९० विषय क्रमांक – २१
दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्र.७ दि.१२/३/२०२१ व ९/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ६९१ विषय क्रमांक – २२
दिनांक – २०/८/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती**

अ) कार्यपत्रिका क्रमांक ८ दि.१८/३/२०२१ व दि.२१/६/२०२१चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) कार्यपत्रिका क्रमांक ९ दिनांक ०१/०७/२०२१, १५/०७/२०२१ व १६/०७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क)कार्यपत्रिका क्रमांक १० दि.२०/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-५४ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.महापौर- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

------

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/८०४/२०२१
दिनांक - ८/९/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील
योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(मा.अतिरिक्त आयुक्त, (१) यांचेकडील पत्र

क्र.प्रशा/१/कावि/८५४/२०२१, दि.२८/०७/२०२१ **विषय क्र.४ च्या लगत)**

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११ ०१८

**प्रपत्र-अ**

| अ.क्र. | पदनाम | उमेदवाराचे नाव | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | युरो सर्जन | डॉ.कुडलिकर उपेंद्र माधवराव | खुला |
| २ | नेफ्रोलॉजिस्ट | डॉ.बिराजदार निरज बसवराज | खुला |
| ३ | ऑन्को सर्जन | डॉ.पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद | खुला |
| ४ | निवासी वैद्यकीय अधिकारी | डॉ.पवार मनिष नामदेव | खुला (वि.जा.(अ)) |
| ५ | अनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ) | डॉ.विधाटे वैशाली बबनराव | इतरमागासवर्ग |
| ६ | क्ष किरण शास्त्रज्ञ | डॉ.भिरुड हेमंत चंद्रकांत | इतरमागासवर्ग |
| ७ | सर्जन | डॉ.निकम राहूल मधुकर | अनुसूचित जाती |
| ८ | फिजिशियन | डॉ.सरदे कपिल सखाराम | इतरमागासवर्ग |
| ९ | बालरोग तज्ञ | डॉ.सोनी सिमा प्रविण | खुला |
| १० | अस्थिरोग तज्ञ | डॉ.पाटोळे विवेक विश्वनाथ | अनुसूचित जाती |
| ११ | त्वचा व गुप्तरोग तज्ञ | डॉ.नितनवरे गुंजन सुरेंद्र | खुला (अनु.जाती) |

सही/-
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

( मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.वैद्य/०९/कावि/४१२४/२०२१ दि.५/८/२०२१ विक्र.१३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

वैद्यकीय मुख्य कार्यालय

शासनाकडून किंवा शासकिय अधिका-याकडून प्राप्त झालेले शासननिर्णय, आदेश,निर्देश, अधिसूचना, परिपत्रके, पत्रे इ.चा माहिती तक्ता

"प्रपत्र अ"

| अक्र | पत्र क्र. व दिनांक | कोणाकडून प्राप्त | तपशील |
|---|---|---|---|
| १ | D.O. No. 1940407/2020/Imm, Dated 20/05/2021 | Additional Secretary & Mission Director (NHM),Govt.of India, Dept. of Health & Family Welfare | कोवीड १९ रोगासाठी तयार करणेत आलेल्या Covishield & Covaxine या दोन्ही लसी दोन वेळा घेण्यासाठी दोन्ही लसी दरम्यान असलेल्या कालावधी बाबत. |
| २ | क्र. सआसकपुणे/तृतीय पंथी/कोविड-१९/२०२१-२२/२०२७, दिनांक – ३१/०५/२०२१ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,पुणे | तृतीय पंथियाचे हक्काचे संरक्षण व कल्याण मंडळ . कोविड-१९ या महामारीच्या पार्श्वभुमीवर तृतीयपंथीयांना कोविड लस प्राधान्याने देणे बाबत. |
| ३ | जा.क्र.दिकआ/प्र-४-मति//कोरोना टेस्टींग/उपचार/लसीकरण/२०२१-२२/३७५०,दि. ०३/०६/२०२१ | सक्षम न्यायाधीकरण तथा आयुक्त,दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे. | राज्यातील अनाथ मतिमंद बालगृहातील प्रवेशीत मुला-मुलींना तसेच कर्मचारी यांना कोरोना टेस्टींग,उपचार व लसीकरणासाठी प्राधान्याने/तातडीने सोई सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणेबाबत. |
| ४ | D.O. No. 2072903/2021/Emmunization Dated 07/06/2021 | Additional Secretary & Mission Director (NHM),Govt.of India, Dept. of Health & Family Welfare | Administration of second Dose of Covishield Vaccine prior to Prescribed Time interval (after 28 days but before 84 days) to persons intending to undertake international travel for education purposes,for joining employment in foreign countries & for india's contingent to Tokyo Olympics. |
| ५ | Dated 15/06/2021 | Additional Chief Secretary, Govt.of Maharastra, Public Health Dept. | Guidelines for breastfeeding newborns born to Covid Positive Mother. |
| ६ | जा.क्र./ किआ/प्र.७/दिव्यांग लसीकरण/विशेष माहिम/२०२१-२२ /४०३७,दि.०१/०७/२०२१ | आयुक्त,दिव्यांग कल्याण आयुक्तालय, | राज्यात दिव्यांग व्यक्तीकरिता कोविड लसीकरण प्राधान्याने करण्यासाठी विशेष लसीकरण मोहिम राबविणे बाबत. |
| ७ | पत्र क्र. ससंआसे/किजरो/झिका आजार/न.क्र.-४/२०२१,दि. १४/०७/२०२१. | संचालक, आरोग्य सेवा, पुणे – ०१ | झिका विषाणुमुळे पसरणा-या आजाराबाबत. |
| ८ | शासन निर्णय क्र- अनाथ-२०२१/प्र.क्र.४९/का-०३,दि. १७ जून २०२१ | अवर सचिव,महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन | कोरोना (कोविड-१९) संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य मिळणेबाबत नविन योजना. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | क्र.कोविड-२०२१/प्र.क्र.४८२/कु.क. सार्वजनिक आरोग्य विभाग,दि.२७/०७/२०२१ | अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन | अंथरुणांना खिळलेल्या व शारीरीक हालचाल करता न येणा-या व्यक्तींसाठी कोविड-१९ लसीकरणा संदर्भात मार्गदर्शक सुचना . |
| १० | Sops on COVID-19 Vaccination of persons without prescribed Identity Cards through CoWin. | | |

अति.आयुक्त

05/08/21

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नगरसचिव विभाग

आ.क्र. 22653/.........दि.5/8/21

मु.लिपिक कार्यालय अधिक्षक नगरसचिव